MHST090001752015

<u>रे.दि.मु.नं.३०/२०१५ मधील नि.क्र.१०५ वरील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज ति–हाईत इसम यांनी त्यांना दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० अन्वये दाव्यात पक्षकार म्हणून सामील करुन घेणेकामी दाखल केला आहे.

२. ति–हाईत इसम यांनी असे कथन केले आहे की, वादी यांनी सांप्रतचा दावा वाटपासाठी आणि तुर्तातुर्त मनाईकरिता दाखल केलेला आहे. मौजे ल्हासुर्णे, ता.कोरेगाव, जि.सातारा येथील गट नं. ७०७, क्षेत्र ५९ आर, आकारणी ६ रू. ७४ पैसे, ही संपुर्ण मिळकत प्रतिवादी नं.२ यांचे नावे होती व आहे. दि. १५/०९/२०२३ पुर्वीच प्रतिवादी नं.२ व तिचे पती प्रकाश हणंमत घोरपडे यांना आर्थिक अडचण असल्याने त्यांनी र.रु.४,२०,०००/– स्विकारली व सदर मोबदल्यापोटी प्रतिवादी नं. २ यांनी ति–हाईत इसम यांना गट नं. ७०७ जमीन मिळकती मधील २० आर क्षेत्राचे दस्तामधील नमुद चतुःसिमेसह कायम खुषखरेदीपत्र करून दिले. परंतु त्यावेळी प्रतिवादी नं.२ हिने त्यांना सदरची जमिन मिळकत ही निर्वेध असून सदर मिळकतीबाबत कोणत्याही न्यायालयात दावा प्रलंबित नाही अशी तोंडी हमी व आश्वासन दिलेने त्यांनी खरेदीपत्र प्रतिवादी नं.२ यांचेकडुन करून घेतलेले आहे.

३. त्यांनी गट नं. ७०७ मधील २० आर क्षेत्राचे दि. १५/०९/२०२३ रोजी खरेदीपत्र करून घेतलेनंतर ७/१२ रेकॉर्डला खरेदीदस्ताचे नोंदीस अर्ज दिलेनंतर दि.०४/१०/२०२३ रोजी हरकतीचा अर्ज वादी यांनी दिला. त्यावेळी

सदरचे मिळकती संदर्भात दावा प्रलंबित असलेची व त्यामध्ये विक्रीस मे. कोर्टाचा स्थगितीचा आदेश असलेचा व प्रतिवादी नं.२ व तिचे पती प्रकाश हणमंत घोरपडे यांनी फसवणुक केलेचे निदर्शनास आले. त्यामुळे, मंडलाधिकारी कोरेगांव यांचेसमोर त.र.नं. २२/२०२३ प्रलंबित आहे.

४. सदर दाव्यातील मिळकती संदर्भात तिहा–ईत इसमाचा हितसंबंध आहे. सदर दाव्यात कोणताही आदेश झालेस त्याचा परिणाम ति–हाईत इसमावर होणार आहे. सबब त्रयस्थ व्यक्तीचे म्हणणे मांडुन व बाजु ऐकुन घेणे न्यायाचे आदेशाकरीता आवश्यक आहे. वादीस ति–हाईत इसमाबाबतची सर्व माहिती असुन देखील वादीने हेतुपुरस्कर ति–हाईत व्यक्तीला सदर दाव्यात पक्षकार म्हणुन सामील केलेले नाही. सदर दाव्यातील गट नं.७०७ मधील २० आर क्षेत्र खरेदीदस्तामध्ये नमुद क्षेत्रासह कब्जात व वहिवाटीस असून खरेदी केलेली असल्याने दाव्यातील विनंती लक्षात घेता त्याचा सरळ परिणाम ति–हाईत इसमावर होणार आहे. त्यामुळे ति–हाईत इसमास सदर दाव्याचे कामी पक्षकार म्हणून सामील करणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांनी अशी विनंती केली आहे की, सदरचा अर्ज मंजूर करण्यात यावा.

५. वादींचे असे कथन आहे की, त्रयस्त इसमांचा अर्ज खोटा व लबाडीचा आहे. नि.क्र.५ ला दावा मिळकत विकू नये असा आदेश आहे. त्याची माहिती प्रतिवादी क्र.२ ला होती. त्यामुळे तिला कोणताही हस्तांतरणाचा व्यवहार करणेचा अधिकार नाही. तिने व्यवहार केला असल्यास त्यास लीस पेंडन्स या तत्वाची बाधा येते. तथाकथित व्यवहार वादींवर बंधनकारक नाही. त्यामुळे सदर व्यवहाराबाबत त्रयस्त इसमाला अशा प्रकारचा अर्ज करण्याचा अधिकार नाही. त्यामुळे, त्यांची अशी विनंती आहे की, सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

६. दाव्याचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, वादींनी प्रस्तुतचा दावा वाटप व निरंतर मनाईकरीता दाखल केलेला आहे. अशा स्वरुपाच्या दाव्यामध्ये सर्व आवश्यक पक्षकारांना सामील करणे बंधनकारक असते. त्यामुळे दावा मिळकतीच्या वादाचे कायमचे निराकरण होण्याकरीता ति–हाईत इसमास दाव्यात पक्षकार म्हणून सामील करणे आवश्यक आहे असे मला वाटते. तसेच ति–हाईत इसमास दाव्यात सामील केल्याने वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलटपक्षी वाद मिळकतीच्या वादाचे कायमचे निराकरण होण्यास मदत होईल. त्यामुळे मी या निष्कर्षास आलो आहे की, सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे–

**आदेश**

(१) ति–हाईत इसम यांचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

(२) वादींनी ति–हाईत इसम यांना दाव्यात प्रतिवादी म्हणून सामील करावे व आवश्यक ती दुरुस्ती करुन घ्यावी.

(३) खर्चाबाबत आदेश नाही.

ANKUSH ATMARAM PACHARNE

Digitally signed by ANKUSH ATMARAM PACHARNE
Date: 2024.09.19 12:34:13 +0530

कोरेगाव.
दि. १०/०९/२०२४

**( ए. ए. पाचरणे )**
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कोरेगाव.